ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणेबाबत. (श्रीम.पुष्पावती सिताराम डेरे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कर्जुनेखारे ता.अहिल्यानगर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/४४८/२०२६
दिनांक- स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

<u>संदर्भ</u> - १.या कार्यालयाकडील सेवानिलंबन आदेश क्र.ग्रापं-३/२४२७००८/२०२६, दि.०८/०६/२०२६.
२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(३)
३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(५)
४. शासन निर्णय क्र.निप्रआ११२२/प्र.क्र.०९/विचौर/२०२५,दिनांक २२ एप्रिल २०२५.

संदर्भ क्रमांक १ चे आदेशान्वये श्रीम पुष्पावती सिताराम डेरे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कर्जुनेखारे ता.अहिल्यानगर येथे कार्यरत असताना त्यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर यांनी गुन्हा दाखल केल्याने त्यांना जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबीत करण्यात आलेले आहे. श्रीम पुष्पावती सिताराम डेरे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कर्जुनेखारे ता.अहिल्यानगर यांचे गैरवर्तनाबाबत दोषारोप ठेवून शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु केलेली आहे.

संदर्भ क्रमांक ४ चे शासन निर्णयानुसार श्रीम पुष्पावती सिताराम डेरे, सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचा यांचा निलंबन कालावधी हा तीन महिन्यांपेक्षा अधिक झालेला असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा सक्षम प्राधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये श्रीम पुष्पावती सिताराम डेरे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कर्जुनेखारे ता.अहिल्यानगर यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेत पंचायत समिती --संगमनेर---------- येथे पुन:स्थापित करीत आहे.

श्रीम पुष्पावती सिताराम डेरे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कर्जुनेखारे ता. अहिल्यानगर यांचा या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय, पुढील सुरु असलेली शिस्तभंगविषयक कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल. जिल्हा परिषद सेवेत पुन:स्थापित आदेशाची नोंद श्रीम पुष्पावती सिताराम डेरे, सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचे मुळ सेवा पुस्तकात संबंधित खातेप्रमुख यांनी घ्यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९३००६०१८६ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 30-09-2026 15:09:53
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. श्रीम पुष्पावती सिताराम डेरे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कर्जुनेखारे ता. अहिल्यानगर
द्वारा :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी.
२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबतची पोहोच कार्यालयास सादर करावी.
३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
४. गटविकास अधिकारी, पंचायत समिती --संगमनेर---
२/- श्रीम पुष्पावती सिताराम डेरे, सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी हे हजर झालेनंतर अहवाल इकडेस सादर करावा.